# सहकाराच्या मुलभुत तत्वाच्या पुनर्रचनेची गरज

**ए.एम. वानखडे**
एस.एस.एस.के.आर. इन्नाणी महाविद्यालय.
कारंजा(लाड), जि. वाशिम.

## सारांश

*एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळत विसाव्या शतकातील सहकारी मुलभुत तत्वे ही मार्गदर्शक ठरु शकतील काय याचा विचार करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. आणि पुन्हा या तत्वाची पुनर्रचना करण्याची आवशकता आहे काय. याचा विचार करणे आजच्या परिस्थीतीत आवश्यक ठरले आहे. कारण एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकामधे 1995 मध्ये मांडलेली सहकारासची पुर्नरचीत मुलतत्वे मार्गदर्शक ठरत आहे काय. याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. म्हणुन शोध निबंधामध्ये आजपर्यंत मांडलेल्या तत्वाविषयी माहिती व त्याच्या पुनर्रचनेची गरज का भासते. या विषयी सविस्तर माहिती लिहत आहे.*

## प्रस्तावना

सहकाराच्या मुलतत्वाची मागणी केल्यानंतर जगामध्ये प्रथम त्या तत्वाची 1937,1966 आणि 1995 मध्ये पुनर्रचना करावी की त्या परिस्थितीमध्ये तीच तत्वे लागू होतील यावर विचार केला गेला आणि 1966 मध्ये प्रथम तत्वाची पुनर्रचना केली आणि पुन्हा बदलत्या परिस्थीतीमध्ये दूसऱ्यांदा 1995 मध्ये ह्या तत्वाची पुनर्रचना केली गेली परत त्या नंतर आज 18 वर्षानी हीच तत्वे मार्गदर्शक ठरु शकतात काय याचा विचार 2012 सहकार शताब्दी वर्षामध्ये केला गेला आणि तीच तत्वे सद्ध्या स्थीतीत कायम ठेवली गेली. ह्या तत्वाला सहकारी संस्थेमध्ये अत्यंत महत्व आहे कारण तत्वे म्हणजे नियमांचा संच आहे. हे नियम परिस्थीती नुसार बदलले तरच सहकारी संस्था योग्य कार्य करु शकेल कारण सहकारी संस्था ही व्यवसाय संघटनेचा एक प्रकार आहे. त्यामुळे व्यवसायामध्ये जसे बदल होत जातील त्या प्रमाणे सहकारी चळवळीत सुध्दा बदल होणे आवश्यक ठरते. त्या करीता तत्वाच्या पुनर्रचनेची गरज असते.

## सहकार – व्यवहार कार्य तत्व पुनर्रचना

सहकाराची तत्व म्हणजे थोडक्यात व्यवहार पार पाडण्यासाठी तयार केलेल्या नियमांचा संच असे म्हणु शकतो. सहकारी संस्थेचे व्यवहार पार पाडण्याकरीता जी नियमांची गरज आहे. त्यावर तिची भिस्त अवलंबून आहे ती भिस्त म्हणजे सहकाराचे तत्व होय. जगातील आर्थिक विषमता दुर करण्याकरीता सहकारी चळवळीकडे पाहिले जाते. आपल्या देशातील शेतकऱ्यांना सहकारी संस्था ह्या त्यांच्या विकासाकरीता व त्यांचे जिवनमान सुधारण्याकरीता वरदान ठरल्या आहे. तर संपुर्ण जगात आर्थिक विषमता निर्मुलनाचे एक साधन म्हणून सहकारी क्षेत्राकडे पाहले जात आहे. याचे कारण म्हणजे सहकार हे आजच्या आधुनिक युगातसुध्दा आर्थिक व सामाजिक विषमतेच्या विरोधातील एक हत्यार आहे. आणि या हत्याराने आपले कार्य कार्यक्षमतेने पार पाडने आवश्यक आहे. हे कार्य तत्वानुसार पार पाडले जात आहे. म्हणून आजच्या बदलत्या परिस्थीतीत सहकारी संस्थेने आपले कार्य कार्यक्षमतेने करावे म्हणून तिच्या तत्वाकडे पाहणे गरजेचे आहे. अशा या तत्वाची मांडणी जगात प्रथम इंग्लड देशामधील राश्डेल प्रणेत्यांनी 1844 मध्ये केली त्या तत्वाला राश्डेल तत्व म्हणतात. आणि ती जगभर सहकारी तत्व म्हणून ओळखली जाऊ लागली परंतू 1930 च्या आसपास बदलत्या राजकीय परिस्थीतीमध्ये सहकारी तत्वाची उपयोगीता निश्चीत करण्याची गरज भासू लागली आणि म्हणून आतंरराष्ट्रीय सहकार संघटनेने एका समितीचे गठण केले आणि या समितीने आपला आहवाल सादर केला. या आहवालामध्ये त्यांनी तत्वामध्ये बदल न करता या तत्वाचे दोन टप्प्यात वर्गिकरण करुन स्वीकारण्यात आले. आणि 1937 मध्ये या तत्वाला मुल तत्व म्हणून मान्यता मिळाली.

जगामध्ये सहकारी चळवळीच्या विकासाबरोबर काही कालांतराने हे सिध्द झाले की वरिल तत्वाचे वर्गिकरण हे अवास्तव झाले आहे. ते कालानुरुप नव्हते आणि म्हणुन काही कालांतराने या तत्वांच्या पुनर्रचनेची आवश्यकता भासू लागली. पूढील काळामध्ये मोठे बदल झाले दुसरे महायुध्द, अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली आणि त्यामुळे जगातील सामाजीक, राजकीय तसेच आर्थिक परिस्थीतीत बदल घडून येवून विकासाला चालना मिळू लागली अशा विकासाच्या बदलत्या परिस्थीतीमध्ये सहकाराची तत्वे पुनर्रचीत करण्याचा विचार समोर येवून 1964 साली आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने याकरीता तज्ञ समिती गठीत केली आणि या

समितीने आपला अहवाल 1966 मध्ये सादर केला. त्या अहवालामध्ये

1. खुले व ऐच्छिक सभासदत्व.
2. लोकशही पध्दतीने कारभार.
3. भांडवलावर मर्यादित व्याज.
4. नफ्याची न्याय वाटणी.
5. सहकारी शिक्षणाचा प्रसार.
6. सहकाराअंर्तगत सहकार.

या सहा पुनर्रचीत मुलतत्वांची मांडणी केली आणि आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने 1967 मध्ये मुलतत्वे म्हणून ही स्वीकारली. ही आधुनिक तत्वे सर्वानुमते मान्य करण्यात आली.

या तत्वाची मांडणी केल्यानंतर 1987 च्या सुमारास सहकारी चळवळीत निर्माण होवू लागलेल्या संभाव्य स्पर्धेची जाणीव आंतरराष्ट्रीय संघटनेचे अध्यक्ष लार्समार्कस यांना झाली आणि याच काळात मुक्त अर्थव्यवस्था, शेतीव्यवसायाला दिल्या जाणाऱ्या अनुदानात कपात, खाजगीकरण, बाजार व्यवस्थेचे जागतीकीकरण, खुल्या जागतिक अर्थव्यवस्थेकडे वेगाने वाटचाल केली. भारताने सुध्दा 1991 मध्ये या धोरणाचा स्वीकार केला. आणि मुक्त व्यापार व्यवस्थेकडे देश वळला. त्यामुळे जगातील सहकारी चळवळीवर सुध्दा त्याचा परिणाम होवू लागला. अशा परिस्थितीत आपले अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी 1992 मध्ये मुल्ये निश्चीत केली. आणि 1995 मध्ये मॅचेस्टर येथे आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेच्या शताब्दी दिना निमित्त झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेचा या सात तत्वांना पुनरनिर्धारित मूलतत्व म्हणून स्वीकारली. ती पूढिल प्रमाणे

1. खुले व ऐच्छीक साभसदत्व.
2. लोकशाही नियंत्रण.
3. सभासदांचा आर्थिक सहभाग.
4. स्वायत्ता व स्वांतत्र.
5. शिक्षण, प्रशिक्षण व माहिती.
6. सहकाराअंर्तगत सहकार.
7. समुदायाप्रति निष्ठा/समाजकल्याणाची भावना.

ह्या तत्वांची मांडणी करुन ती सर्वानुमते स्विकारली गेली परंतू पुन्हा 1995 पासून झालेल्या बदलाचा विचार करुन ही तत्वे योग्य आहे काय? किंवा या तत्वामध्ये बदल करण्याची म्हणजे पुनर्रचना करायची यावर विचार होवून 2012 च्या आंतरराष्ट्रीय वर्षात याच तत्वाची जगातील सहकारी चळवळीने प्रकर्षाने अंमलबजावणी केली पाहिजे. असे प्रतिपादन करण्यात आले. मात्र पुढील काळत बदलत्या जागतिक परिस्थीतीचा विचार करुन ह्या तत्वाच्या पुनर्रचनेची गरज भासू शकते कारण असे दिसून येते की सहकारी चळवळ सातत्याने बदलत आहे. आणि भविष्यात ती बदलत राहिल ज्या प्रमाणे व्यवसायामध्ये बदल होतील तसे बदल सहकारी चळवळीत होत जातील परंतु हे बदल होत असतांना मानवीजिवनाच्या विकासाचा, कल्याणाचा विसर पडलेला नाही हे लक्षात ठेवूनच तत्वाची पुनर्रचना केली जाईल.

## निष्कर्श

सहकारी तत्वाची मांडणी ही सहकारी चळवळीच्या उगमापासूनच करण्यातआली प्रथम 1844 मध्ये इंलग्ड मधील राश्डेल प्रणेत्यांनी सहकरी तत्वाची मांडणी केली त्याला राश्डेल तत्वे संबोधल्या जाऊ लागले. परंतु काळाच्या बदलानुसार तत्वामध्ये बदल होणे आवश्यक होते म्हणून ह्या तत्वाची पुनर्रचना करण्यात आली 1937 मध्ये या तत्वाचे दोन भागात वर्गीकरण करण्यात आले परंतु 1967 आणि 1995 मध्ये या मुलतत्वाची पुर्नरचना करण्यात आली. तत्वे ही आजच्या परिस्थीतीमध्ये स्वीकारणे योग्य आहे काय? असे वाटू लागले आणि ह्या तत्वाविषयी 2012 च्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये प्रतिपादन केल्या गेले की ह्या तत्वाची आजच्या परिस्थितीमध्ये पुर्नरचना करण्याची गरज नाही. परंतु कालांतराने ह्या तत्वाची पुनर्रचना करण्याची गरज भासू शकते. संपूर्ण एकविसाव्या शतकात हीच तत्वे योग्य राहील हे सांगता येत नाही.

## संदर्भ


**बियाणी, प्रमोद (2004).** सहकार इतिहास व तत्वे, प्रकाशन य. च. मुक्त विद्यापीठ.

**कांयदे, गंगाधर वि. (2006).** सहकार मुलतत्वे, भारतातील सहकार, सहकार आणि ग्रामिण विकास, सहकार सिध्दांत आणि व्यवहार, चैतन्य पब्लीकेशन नाशिक

**पाटिल, प्रताब बा. (2012).** सहकारी जगत, प्रकाशक महाराष्ट्र प्रादेशिक सहकरी मंडळ पुणे

**भोसले व दामाजी (2007).** सहकार, फडके प्रकाशन